# वस्तू आणि सेवा कर व शेअर बाजार या विषयावर व्याख्यान आयोजित अहवाल

महाविद्यालयाचे मा.प्राचार्यांच्या आदेशानुसार दि.४/८/२०१७ रोजी वस्तू आणि सेवा कर व शेअर बाजार या विषयावर व्याख्यान आयोजित कले. व्याख्यातो म्हणून प्रा.डॉ.डी.डी.भक्कड, एसपीडीएम वरीष्ठ महाविद्यालय शिरपुर जि.धुळे यांना आमंत्रित करण्यात आले.

या व्याख्यानाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे होते. या व्याख्यानाला महाविद्यालयातील प्रा.डॉ.जे.एन.चौबे पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तसेच वाणिज्य विद्याशाखेतील प्रा.डॉ.अे.पी.पी.निकम यांनी या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

व्याख्यानास महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील तसेच इतर शाखेतील विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर वर्ग उपस्थित होते. वस्तू आणि सेवा कर १ जुन २०१७ ला कायदा भारतात लागू झाला. त्यामुळे या कायद्याची विद्यार्थी, शिक्षक व व्यावसायिक व इतर वर्गास या विषयीची उत्सुकता होती. त्यामुळेच या विषयाचे सी.गो.पाटील वरीष्ठ महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन मा.प्राचार्य सो. यांनी करण्यास सांगितले.

प्रा.डॉ.डी.डी.भक्कड यांनी पीपीटी चा उपयोग करुन अतिशय सोप्या भाषेत विषयाची मांडणी करुन श्रोत्यांना समजून सांगितला त्याच बरोबर शेअर बाजार विषयी माहिती सांगितली.

सदर व्याख्यानाचे सूत्र संचालन आभार विद्यार्थ्यांनीचे केले. नविन कायद्यावर महाविद्यालयाने व्याख्यान आयोजित केल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी समाधान व्यक्त केले.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College ★ SAKRI, Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Scanned by CamScanner

सकाळ
धुळे, शुक्रवार,
१८ ऑगस्ट २०१७
३



साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे झालेल्या व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. दिनेश भक्कड. शेजारी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्रा. ए. पी. निकम आदी. (छायाचित्र : धनंजय सोनवणे)

## पाटील महाविद्यालयात 'जीएसटी'वर कार्यशाळा

साक्री, ता. १७ : वस्तू आणि सेवाकरामुळे देशात होणारी करचोरी रोखण्यास मदत होणार आहे. यातून महसूल वाढण्यास मदत होणार असून, वाढलेल्या महसुलातून विकासकामांसाठी भांडवल उपलब्ध होईल. यामुळे देशाच्या विकासासाठी 'जीएसटी' करप्रणाली फायदेशीर असल्याचे मत शिरपूर येथील प्रा. डॉ. दिनेश डी. भक्कड यांनी व्यक्त केले. येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात 'जीएसटी आणि भागभांडवल बाजार' या विषयावर वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा झाली, तीत ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, वाणिज्य विभागाचे प्रा. ए. पी. निकम, प्रा. डॉ. जे. बी. चौबे, प्रा. डॉ. विजय बच्छाव, प्रा. निखिल सोनवणे, प्रा. हसन तडवी, प्रा. सतीश वेंदे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. जीएसटीमुळे नोकरीच्या संधीही वाढणार असून, देशात सर्वत्र एकाच दरात वस्तू घेता येतील, असे सांगत प्रा. भक्कड यांनी यापूर्वीची कररचना आणि जीएसटीतील फरक स्पष्ट केला.

V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist. Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule

Scanned by CamScanner